सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १०५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २ जून २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## शेतकरी कर्जमाफी योजनेला मंत्रिमंडळाची मान्यता

### २ लाखांपर्यंतच्या कर्जमाफीवर शिक्कामोर्तब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई** गेल्या वर्षी विविध कारणांमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानीचा सामना करावा लागला होता. त्या पार्श्वभूमीवर यावर्षीचा अर्थसंकल्प सादर करताना राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची घोषणा केली होती. मात्र या कर्जमाफीची अंमलबजावणी कशी होणार,याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. दरम्यान, शेतकरी कर्जमाफीच्या योजनेला राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच शेतकऱ्यांच्या २ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीवर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे.



राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. या कर्जमाफीच्या घोषणेनंतर आज या निर्णयाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. राज्य मंत्रिमंडळाने कर्जमाफीच्या योजनेला दिलेल्या मान्यतेनुसार राज्यातील शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे माफ होणार असून, ही संपूर्ण कर्जमाफीची योजना ही ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची असणार आहे.राज्य सरकारने अर्थसंकल्पामध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. या कर्जमाफीच्या घोषणेनंतर आज या निर्णयाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. राज्य मंत्रिमंडळाने कर्जमाफीच्या योजनेला दिलेल्या मान्यतेनुसार राज्यातील शेतकऱ्यांचे दोन लाख रुपयांपर्यंतचे माफ होणार असून, ही संपूर्ण कर्जमाफीची योजना ही ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची असणार आहे.

मात्र सध्या राज्यात विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्यामुळे या कर्जमाफीची तातडीने घोषणा करण्यात आलेली नाही. आता सहकार विभागाकडून या कर्जमाफी योजनेबाबत अटीशर्तींचतं परिपत्रक काढण्यात येणार आहे. त्यानंतर या योजनेबाबत अधिक माहिती समोर येणार आहे.

## काँग्रेसमध्ये 'प्रदेशाध्यक्ष हटाव'ची मागणी!

### हर्षवर्धन सपकाळांच्या विरोधात गट तयार दिल्ली हायकमांडची घेणार ८ जूनला भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई** महाराष्ट्र काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजी आता विकोपाला गेली असून, हा वाद थेट दिल्ली दरबारी पोहोचण्याची चिन्हे आहेत. विद्यमान प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत पक्षांतर्गत विरोधकांनी आता त्यांच्याविरोधात मोठी आघाडी उघडण्यास सुरुवात केली असल्याची खात्रीलायक माहिती मिळत आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील नाराज नेत्यांचा एक मोठा गट येत्या ८ जून रोजी दिल्लीत जाऊन थेट काँग्रेस हायकमांडची भेट घेणार असून, पक्षश्रेष्ठींसमोर 'प्रदेशाध्यक्ष बदला' अशी मागणी ते लावून धरणार असल्याचे आता जवळपास स्पष्ट झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर नाराज असलेला राज्यातील काँग्रेस नेत्यांचा गट ८ जून रोजी नवी दिल्लीत धडकणार असून, ते काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि पक्षाचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडणार आहेत. या विशेष शिष्टमंडळात राज्याच्या काँग्रेसमधील ४ ते ५ विद्यमान आमदार आणि अनेक ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा समावेश असल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली असून, नाराजांच्या या थेट दिल्ली दौऱ्यामुळे आता राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



**अंतर्गत वादाचे कारण- संघटन सृजन अभियान**

काँग्रेसमधील या अंतर्गत वादाचे मुख्य कारण नुकतेच पक्षात राबवण्यात आलेले संघटन सृजन अभियान असल्याचे स्पष्ट झाले आहे. या मोहिमेअंतर्गत राज्यभरात नवीन शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. मात्र, या अत्यंत महत्त्वाच्या निवडी करताना स्थानिक नेते आणि ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले गेले नसल्याचा गंभीर आरोप नाराज गटाकडून केला जात आहे. या प्रक्रियेत चुकीच्या पद्धतींचा मनमानीपणे अवलंब झाल्यामुळे पक्षातील निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये आणि नेत्यांमध्ये मोठी खदखद निर्माण झाली आहे.

**काँग्रेस हायकमांड काय निर्णय घेणार याकडे असणार लक्ष-** वरवर पाहता काही मोजकेच पदाधिकारी ही मोहीम उघडपणे चालवत असल्याचे दिसत असले, तरी या 'प्रदेशाध्यक्ष हटाव' मोहिमेला राज्यातील काही अत्यंत वजनदार आणि बड्या काँग्रेस नेत्यांचे छुपे बळ असल्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे. ऐन विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसमधील ही संघटनात्मक धुसफूस चव्हाट्यावर आल्याने पक्षाची डोकेदुखी वाढली आहे. आता येत्या ८ जून रोजी होणाऱ्या दिल्लीतील बैठकीत काँग्रेस पक्षश्रेष्ठी या नाराजीवर काय तोडगा काढतात आणि प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या भवितव्याबाबत काय मोठा निर्णय घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे.

## अपात्र लाडक्या बहिणींना माफी पण १४ हजार पुरुष लाभार्थ्यांकडून वसुली करणार

### मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावले

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२मुंबई** लाडकी बहीण योजनेतून ८१ लाख महिलांना वगळण्यात आले असले तरी त्यापैकी अपात्र ठरलेल्या महिलांकडून आतापर्यंत देण्यात आलेल्या लाभाचे पैसे वसूल केले जाणार नाहीत. अपात्र महिलांना एकवेळ माफी दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. मात्र त्याचवेळी ही योजना केवळ महिलांसाठी असतानाही योजनेचा लाभ घेणाऱ्या १४ हजार पुरुषांकडून मात्र लाभाची रक्कम वसूल केली जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केले. ही योजना सुरू झाली त्यावेळी २ कोटी ४७ लाख लाभार्थी होते. लाभार्थींना केवायसी बंधनकारक करून निकष तपासायला सुरुवात झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने ही संख्या कमी होऊन मे अखेरीस लाभार्थींची संख्या १ कोटी ६६ लाखांवर येऊन ठेपली. यावरून विरोधकांनी महायुतीवर



टीकेची झोड उडवली असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील एका कार्यक्रमामध्ये या योजनेतली लाभार्थींची संख्या कमी झाल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी सांगितले, "पडताळणीत या योजनेचा लाभ घेणाऱ्यांत १४ हजार पुरुष, पाच लाख सरकारी कर्मचारी, प्राप्तीकर भरणाऱ्या दहा लाख महिला आढळल्या. या सगळ्यांनी ई-केवायसी केली नाही. त्यामुळे जे योजनेसाठी अपात्र ठरले त्यांचेच मानधन थांबवले आहे. २५ लाख महिलांची केवायसी चुकली होती त्यात दुरुस्ती केली." मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, ही योजना सुरू केली तेव्हा योजनेचे निकष स्पष्ट होते. आधी पडताळणी केली असती तर त्यातच वर्ष निघून गेले असते. त्यामुळे महिलांनी अर्ज भरताना दिलेली माहिती खरी मानून सरसकट सर्वांना योजना लागू केली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

## बाजोरिया यांचा नामांकन अर्ज बाद

### जिल्हाधिकारी कार्यालयात रात्रीपर्यंत हायव्होल्टेज ड्रामा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२अमरावती** विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीत अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया यांच्या नामांकन अर्जावर दाखल करण्यात आलेल्या आक्षेपांवर सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी सुरू झाली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी आशीष येरेकर यांच्या समोर दोन्ही बाजूंचे युक्तिवाद मांडण्यात आल्या त्यानंतर बाजोरीया यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यात आला , रात्री ८ नंतर ही सुनावणी सुरू होती.विप्लव बाजोरिया यांनी सादर केलेल्या ११ पानी प्रतिज्ञापत्रात काही आवश्यक माहिती अपूर्ण असल्याचा तसेच प्रतिज्ञापत्राच्या शेवटी उमेदवाराची स्वाक्षरी नसल्याचा आक्षेप प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या वतीने घेण्यात आला आहे. या कथित त्रुटींमुळे बाजोरिया यांच्या नामांकनाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

भाजपचे उमेदवार प्रवीण पोटे पाटील, काँग्रेसचे हर्षजित देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे डॉ. नीलेश विश्वकर्मा तसेच अपक्ष उमेदवार प्रशांत महल्ले यांनी बाजोरिया यांच्या नामांकनाविरोधात अधिकृत आक्षेप दाखल केला आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत अचानक नाट्यमय घडामोडी घडल्या असून राजकीय वर्तुळाचे लक्ष या



प्रकरणाकडे लागले आहे.सायंकाळी पाच वाजता सुनावणी निश्चित करण्यात आल्याने साडेचार वाजल्यापासूनच उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी आणि वकील जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. बाजोरिया यांच्या वतीने ॲड. मिलिंद वैष्णव यांनी बाजू मांडली, तर चारही आक्षेपकर्त्या उमेदवारांच्या वतीने ॲड. प्रशांत देशपांडे, ॲड. संदीप गुप्ता, ॲड. नितीन कोल्हटकर आणि ॲड. चंद्रशेखर डोरले यांनी युक्तिवाद सादर केले. डॉ. नीलेश विश्वकर्मा आणि प्रशांत महल्ले हे या प्रकरणात प्रतिवादी पक्ष म्हणून सहभागी झाले आहेत.सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंकडून कायदेशीर मुद्द्यांवर सविस्तर मांडणी करण्यात आली. कलेक्ट्रेट परिसरात मोठ्या प्रमाणात राजकीय कार्यकर्त्यांची उपस्थिती दिसून आली. त्यामुळे संपूर्ण वातावरण अत्यंत तणावपूर्ण व हायव्होल्टेज बनले होते.

## मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेच्या दुरावस्थेला जबाबदार कोण? महसूल मंत्र्यांचा संतप्त सवाल!

### नागपूर, अमरावती जिल्ह्यातील आरोग्य विभागाचे प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

मेळघाटातील आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत सुविधांच्या अभावाबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत या दुरावस्थेला अखेर जबाबदार कोण? असा आक्रमक सवाल महसूल मंत्री तथा नागपूर, अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत केला. नागरिकांच्या आरोग्याशी होणारी हेळसांड थांबवून, तिथल्या आरोग्यविषयक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी तातडीने युद्धपातळीवर कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

मंत्रालयात आज सार्वजनिक आरोग्य विभागाकडील नागपूर आणि अमरावती जिल्ह्यांच्या प्रलंबित विषयांबाबत बैठक पार पडली. या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत महसूलमंत्र्यांनी आक्रमक पवित्रा घेत दोन्ही जिल्ह्यांतील आरोग्य प्रकल्पांच्या रखडलेल्या कामांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

मेळघाटातील आरोग्य यंत्रणेच्या त्रुटींवर बोट ठेवत महसूल मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अमरावती जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये रेडिओथेरपी आणि डेकेअर किमोथेरपी पीपीपी तत्वावर स्थापन करणे, उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथील रुग्णालयाचे ५० खाटांवरून १०० खाटांवर श्रेणीवर्धन करणे तसेच तिथे तातडीने ट्रॉमा केअर युनिट, सिटी स्कॅन, रक्तपेढी आणि एमआरआय सुविधा उपलब्ध करून देणे आदी कामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



बैठकीत नागपूर जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रलंबित प्रस्तावांवर चर्चा झाली. नरखेड ग्रामीण रुग्णालयाचे ३० ते ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करून निधीला प्रशासकीय मान्यता देणे, कामठी उपजिल्हा रुग्णालयाकरिता एमएसआयडीसी नागपूर मार्फत प्रस्तावाला मंजुरी देणे, उमरेड येथे ट्रॉमा केअर युनिट आणि नवनिर्मित जिल्हा रुग्णालय नागपूर करिता पदनिर्मिती तात्काळ करणे, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय आरोग्य अभियानात समावेश करणे आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासकीय सेवेत समायोजन करणे, कुही ग्रामीण रुग्णालयाच्या ३० खाटांच्या इमारत बांधकामासाठी ३० कोटींच्या सुधारित प्रस्तावास मान्यता देणे आदी प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली.

-ग्रामीण जनतेचा जीव टांगणीला लावणारा आरोग्य यंत्रणेतील ढिसाळपणा खपवून घेतला जाणार नाही. मेळघाट आणि विदर्भातील आरोग्य सुधारणेसाठी आवश्यक असणारे विकास कामांचे सर्व प्रस्ताव तातडीने सादर करा आणि कामाला लागा

**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री-**

## अब्दुल सत्तार-अंबादास दानवे आमनेसामने

### ; गळाभेटीनंतर विलीनीकरणाच्या चर्चांना नवे बळ:समृद्धीवर योगायोग की संकेत?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ छत्रपती संभाजीनगर -** शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना सोमवारी आणखी खतपाणी मिळाल्याचे चित्र दिसून आले. ठाकरे गटाचे आमदार अंबादास दानवे आणि शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांची समृद्धी महामार्गावर अचानक भेट झाली. विशेष म्हणजे, अवघ्या एक दिवसापूर्वी दोन्ही नेत्यांनी शिवसेनेचे दोन गट भविष्यात एकत्र यावेत, असे मत व्यक्त केले होते. त्यामुळे त्यांच्या या भेटीकडे राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले होते. भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी एकमेकांची गळाभेट घेतल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अब्दुल सत्तार मुंबईकडे प्रवास करत होते, तर अंबादास दानवे शिर्डीकडे जात होते. याचवेळी समृद्धी महामार्गावर दोघे समोरासमोर आले. अचानक झालेल्या या भेटीत दोघांमध्ये काही काळ संवादही झाला. काल केलेल्या वक्तव्यांनंतर लगेचच दोन्ही नेत्यांची प्रत्यक्ष भेट झाल्याने शिवसेनेच्या दोन्ही गटांमध्ये काही सकारात्मक हालचाली सुरू आहेत का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.या भेटीला आणखी महत्त्व प्राप्त होण्याचे कारण म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींना तातडीने मुंबईत बोलावले आहे. या बैठकीसाठीच अब्दुल सत्तार मुंबईकडे रवाना झाले होते.



## तुकाराम मुंढे ॲक्शन मोडमध्ये!:राज्यभर अन्न व औषध प्रशासनाची छापेमारी, ३२ जणांना अटक; मिसलिडिंग जाहिरातींवरही कारवाईचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२मुंबई** अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला विक्रेत्यांविरोधात मोठी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत प्रशासनाने अवघ्या दोन दिवसांत तब्बल ४० ठिकाणी छापे टाकले असून, यात ३२ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. या धडक कारवाईत एकूण २४ गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे १२.१६ लाख रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रशासनाच्या या धडक आणि वेगवान कारवाईमुळे अवैधरित्या गुटखा विक्री करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुन्हेगारांना कडक शब्दांत इशारा दिला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी यापुढील काळात कारवाई अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे, २५ मे रोजी तुकाराम मुंढे यांनी या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या २१ वर्षांच्या प्रदीर्घ प्रशासकीय कारकिर्दीतील ही तब्बल २५ वी बदली असून, पदभार स्वीकारताच त्यांनी आपल्या नेहमीच्या आक्रमक आणि शिस्तबद्ध कार्यशैलीची चुणूक पुन्हा एकदा दाखवून दिली आहे.



**मिसलिडिंग जाहिरातींवरही कारवाईचा इशारा**

बड्या ब्रँड्सची आश्वासने आणि मिसलिडिंग जाहिरातींना भुलून ग्राहकांची होणारी फसवणूक थांबवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आता आक्रमक झाले आहे. आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या कंपन्यांना कडक कारवाईचा इशारा दिला असून, अशा जाहिरातींमध्ये सहभागी होणाऱ्या सेलिब्रिटींवरही यापुढे कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. ग्राहक संरक्षणासाठी प्रशासनाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे तुकाराम मुंढे पुन्हा एकदा आपल्या नेहमीच्या आक्रमक कार्यशैलीत सक्रिय झाल्याचे दिसून येत असून, सर्वसामान्य नागरिकांकडून त्यांच्या या तत्परतेचे आणि धडक निर्णयांचे मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे.

## संपादकीय ......

# शेतकर्यांसाठी सक्षम धोरणाची गरज

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या विषयावरून ठोस अंमलबजावणीपेक्षा पुन्हा राजकारण, आरोप-प्रत्यारोपच सुरू झाले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकर्यांची कर्जमाफी हा मागील अनेक दशकांपासून मध्यवर्ती प्रश्न राहिलेला असून अजूनही तो सुटलेला नाही. किंबहुना कुठल्याही सरकारने हा प्रश्न जाणीवपूर्वक सोडवला नाही. शेती, कर्जमाफीचा प्रश्न निसर्ग, सिंचनापेक्षा कृषीधोरणातील त्रुटींशी अधिक संबंधित आहे. कर्जमाफीच्या विषयावर दोन महत्त्वाचे दृष्टिकोन समोर येतात. एक म्हणजे शेतकर्यांना तातडीने मिळणारा आर्थिक व मानसिक दिलासा आणि दुसरा म्हणजे शेती क्षेत्राच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी आवश्यक असणार्या पायाभूत सुधारणा करण्याची गरज, परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात आजपर्यंत यातील पहिल्याच विषयाला राजकीय सोयीसाठी आजपर्यंत महत्व देण्यात आले आहे. शेतकरी आणि कर्जमाफी या एकाच नाण्याच्या दोन बाजू राजकारणाने बनवल्या आहेत. त्यामुळे शेतीचा लाभदायक असा धोरणात्मक विचार कधीचाच मागे पडला आहे. शेतीसमोरील नैसर्गिक आव्हाने तर शेतीचा शोध लागल्यापासूनच आहेत, तरीही त्याचा कृषीसंवर्धनाच्या दृष्टीने तांत्रिक मूल्यांवर आधारित प्रयोगशील शेतीचा शेती आणि कर्जमाफीच्या दृष्टचक्रात कधीचाच मागे पडला आहे. शेती करायची तर ती कृषी उत्पादनासाठी नाही तर कर्जमाफीसाठी असा पायंडा पडला आहे.

शेती, कर्ज आणि कर्जमाफी हा विषय केवळ राजकीय बनून राहिला आहे. केरळात यंदा मान्सून उशिराने दाखल होण्याची शक्यता आहे. त्यातही सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमानाचे संकेत आहेत. यंदा महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत कधी कोरडा दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी, अवकाळी पाऊस आणि गारपीट यांसारख्या संकटांमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे लागवडीचा खर्चही निघणे कठीण होत असताना खरीप हंगामापूर्वी दरवर्षीप्रमाणे कर्जमाफीचा विषयही समोर आला आहे. बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचा खर्च सातत्याने वाढत आहे यात इंधन दरवाढ, जागतिक युद्धाची झळही कारणीभूत आहे. त्यावर सरकारी आणि प्रशासकीय नियंत्रण कठीण असताना तात्पुरत्या अंतर्गत उपाययोजनांची गरज म्हणून कर्जमाफीकडे पाहिले जात आहे. यात शाश्वत शेतीचा विचार नाही, तसा तो कधीही नव्हताच, परंतु कृषीप्रश्नावर केवळ वरवरची मलमपट्टी करून शेतीला असलेला मूळ आजार वर्षानुवर्षे लपवला आणि दाबला जात आहे. शेतीमालाला बाजारात योग्य हमीभाव मिळत नसण्याला सरकारचे कृषीधोरणच प्रामुख्याने कारण आहे, सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकर्यांची दयनीय स्थिती हे याचेच उदाहरण आहे. कांद्याचे क्षेत्र वाढल्याने उत्पादन वाढणार हे कृषी विभागाच्या लक्षात आले नव्हते का? सरकारकडून कांद्याला पुरेसा हमीभाव मिळणार नाही, हे स्पष्ट असताना याविषयी आधीच उपाययोजना का करण्यात आल्या नाहीत. कर्जमाफी ही शेतकर्याला दिलासा जरी असली तरी जोपर्यंत कृषीविषयी धोरणात्मक, अभ्यासपूर्ण दूरगामी धोरण असलेली उपाययोजना केली जात नाही, तोपर्यंत कर्ज आणि कर्जमाफीचे दुष्टचक्र भेदता येणार नाही.

शेतकरी आत्महत्येमागील कारणांचा संवेदनशीलतेने शोध घेणे गरजेचे आहे, परंतु या संवेदनशीलतेआडून तातडीने जाहीर होणार्या उपाययोजना शेतकर्यांना खरंच आर्थिक गर्तेतून बाहेर काढणार्या ठरल्या आहेत का? दुर्दैवाने आजपर्यंतच्या अनुभवातून याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. त्यामुळे शेतकर्यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी सक्षम धोरण ठरवण्यात आपण अपयशीच झालेलो आहोत. कर्जमाफीमुळे शेतकर्याला एका हंगामासाठी दिलासा मिळतो, परंतु पुढील वर्षी पुन्हा निसर्गाची अवकृपा किंवा बाजारभावात घसरण झाल्यास शेतकरी पुन्हा कर्जाच्या खाईत ढकलला जातो. वारंवार मिळणार्या कर्जमाफीमुळे प्रामाणिकपणे कर्ज फेडणार्या शेतकर्यांमध्ये नाराजी पसरू शकते आणि ग्रामीण भागातील 'कर्ज फेडण्याची जबाबदार परंपरा' कमकुवत होते, ज्यामुळे बँका भविष्यात नवीन पीक कर्ज देण्यास कचरतात.निवडणुकीआधी मतांसाठी कर्जमाफीची घोषणा केली जाते, परंतु कर्जमाफीतून राज्याच्या तिजोरीवर पडणारा आर्थिक बोजा कसा संतुलित केला जाईल, याप्रश्नाचे गांभीर्य मतांच्या राजकीय बेगमीपुढे गौण असते. 'कर्जमाफीचे आश्वासन देऊन आता मते पदरात पाडून घेऊ, सत्ता आल्यावर पुढचे पुढे बघू' असेच वेळ मारून नेणारे कामचलावू धोरण त्यामागे असते. यामुळे शाश्वत शेतीसाठी कायमस्वरूपी उपयुक्त ठरणार्या गोष्टी, जसे की- सिंचन प्रकल्प, शीतगृहे, प्रक्रिया उद्योग आणि वीज पुरवठा यासाठी बजेट कमी पडणार आहे. त्याचा फटका फिरून पुन्हा शेती आणि शेतकर्यांनाच बसणार आहे. अनेक लहान आणि गरजू शेतकरी बँकांपेक्षा सावकारांकडून कर्ज घेतात. सरकारी कर्जमाफीचा फायदा प्रामुख्याने संस्थात्मक (बँक) कर्ज घेतलेल्यांना होतो, ज्यामुळे थेट सावकारी पाशात अडकलेला शेतकरी यातून वंचित राहतो.महाराष्ट्रातील शेतकर्यांची हीच बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, राज्य सरकारने नुकतीच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली आहे. या अंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असणार्या पात्र शेतकर्यांचे २ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज माफ करण्याची प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. तसेच नियमित कर्ज फेडणार्या शेतकर्यांना ५०,००० रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदानही दिले जात आहे. कर्जमाफी ही एक तात्कालिक गरज ठरते. मात्र, शेती कायमस्वरूपी फायदेशीर करायची असेल, तर कर्जमाफीसोबतच शेतीमालाला योग्य भाव, सिंचनाची सोय, अचूक हवामान अंदाज आणि कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे या उपायांची गरज आहे. शेतकर्याला 'मागणी करणारा' नाही तर 'पुरवठादार आणि व्यावसायिक' बनवणे, हाच शेतकर्याला सक्षम करण्याचा एकमेव मार्ग आहे.

# अचलपूर तहसीलदारांचा 'तो' बेकायदेशीर आदेश रद्द

## मृताच्या नावावर खटला चालवून मंदिर प्रशासनाविरुद्ध दिला होता एकतर्फी निर्णय

### महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अचलपूर तालुक्यातील नायगाव येथील ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या श्री दत्तात्रय संस्थानच्या मालकीची मौजा नायगाव येथील शेतजमीन एका कब्जेदाराला कुळ कायद्यांतर्गत बेकायदेशीरपणे खरेदी देण्याचा अचलपूर तहसीलदारांचा आदेश उपविभागीय अधिकारी, अचलपुर न्यायालयाने पूर्णपणे फेटाळून लावला आहे. उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी तहसीलदारांचा तो आदेश रद्दबातल ठरवत संस्थानच्या बाजूने अंतिम निकाल दिला आहे.

नायगाव येथील एकूण क्षेत्र १.९६ हेक्टरश्री दत्त संस्थानला एसडीओचे मोठे संरक्षणमालकीची आहे. जमिनीवर गैरअर्जदार आर ही जमीन श्री दत्त संस्थानच्या शिवचरण नागोराव जावरकर व चक्रधर नागोराव जावरकर यांनी कुळ हक्काचा दावा मिळण्यासाठी अचलपूर तहसीलदारांकडे करत कुळ कायद्या अंतर्गत खरेदी अर्ज केला होता. वास्तविक पाहता, यापूर्वी ८ सप्टेंबर १९६७ रोजी तत्कालीन तहसीलदारांनीच कुळ नागोराव चंद्रभान जावरकर यांचा सक्तीची खरेदीचा अर्ज नामंजूर केला होता. ज्याला वरिष्ठ न्यायालयात कधीही आव्हान देण्यातआलेले नव्हते. त्यामुळे त्यांचा कुळाचा अधिकार आधीच संपुष्टात आलेला होता.तरीही, अचलपूर तहसीलदारांनी गंभीर कायदेशीर बाबीकडे डोळेझाक करत १३ एप्रिल २०२३ रोजी गैरअर्जदारांच्या बाजूने खरेदी प्रमाणपत्र देण्याचा आदेश पारित केला. या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मूळ प्रकरणात अचलपूर तहसीलदारांनी संस्थानचे मयत मुख्य विश्वस्त यांना प्रतिवादी (गैरअर्जदार) बनवून मृत व्यक्तीविरुद्ध खटला चालवला. धर्मादाय आयुक्तांचा कोणताही नाहरकत अहवालकिंवा अभिप्राय मागवला गेला नाही. शिवाय, तलाठ्यांच्या शासकीय अहवालानुसार जमिनीच्या सात बारावर कब्जेदाराचे नाव 'कुळ' म्हणून कुठेही नोंदवलेले नव्हते. संस्थानच्या विश्वस्तांनी एसडीओ यांच्या न्यायालयात अपिल दाखल केले. तहसिलदार, अचलपुर यांच्या बेकायदेशीर कृत्याविरोधात महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल यांनी पुढाकार घेतला. त्यांनी संस्थानच्या विश्वस्तांना सहकार्य करून उपविभागीय अधिकारी, अचलपूर यांच्याकडे पाठपुरावा करुन निवेदनाद्वारे संस्थानची भक्कम बाजु मांडली. त्यानुसार सुधारीत आदेश जारी करून तहसीलदारांचा तो वादग्रस्त आदेश न्यायालयाकडून रद्द करण्यात आला.देवस्थानच्या जमिनीचा धार्मिक कार्यासाठी आणि मंदिराच्या देखभालीसाठी विनियोग व्हावा, या न्याय मागणीसाठी लढल्या गेलेल्या या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. या संपूर्ण कायदेशीर प्रक्रियेत आणि निर्णायक विजयात मंदिर महासंघाचे अनुप जयस्वाल यांच्यासह संस्थानचे पंच, विश्वस्त दिपक जावरकर, अविनाश जुनघरे, आशिष जावरकर, सुरेंद्र पवार, श्रीकांत जुनघरे यांनी अहोरात्र परिश्रम घेऊन महत्त्वपूर्ण योगदान दिले. देवस्थानची मालमत्ता सुरक्षित राहिल्याबद्दल संपूर्ण अचलपूर परिसरातून महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या आणि विश्वस्तांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

# शेतकरी मोहन अग्रवाल यांनी स्वखर्चातून उभारला पूल

### सर्व शेतकरी व मजुरांची झाली सोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वरखेड**



शासन आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रखडलेल्या कामांना अनेकदा सामान्य नागरिकांना स्वतः पुढाकार घेऊन पूर्ण करावे लागते. तिवसा तालुक्यातील वरखेड येथे अशाच एका जिद्दी आणि समाजहिताची जाणीव असलेल्या शेतकर्याने स्वतःच्या खर्चातून पूल बांधून ग्रामीण भागासाठी आदर्श निर्माण केला आहे. वरखेड येथील प्रगतशील शेतकरी मोहन अग्रवाल यांनी तब्बल ७० ते ८० हजार रुपये खर्च करून नाल्यावर पूल उभारला असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वरखेड येथील सर्वे क्रमांक ३२ मधील शेतांमध्ये जाण्यासाठी असलेल्या मार्गावर खोल नाला असल्याने शेतकरी आणि शेतमजुरांना दरवर्षी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात नाल्याला पूर आल्यावर शेतांमध्ये जाणे-येणे पूर्णपणे बंद होत असे. अनेक वेळा शेतकरी आणि मजुरांना शेतातच अडकून राहण्याची वेळ येत होती. विद्यार्थ्यांपासून ते महिला मजुरांपर्यंत सर्वांनाच या समस्येचा फटका बसत होता.या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अग्रवाल यांनी परिसरातील शेतकर्यांच्या सह्या घेऊन आमदार आणि खासदारांच्या आढावा बैठकीत निवेदन सादर केले होते. मात्र वारंवार पाठपुरावा करूनही या मागणीची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे परिसरातील शेतकर्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अग्रवाल यांनी स्वतः पुढाकार घेतला. त्यांनी परिसरातील शेतकर्यांना एकत्र येऊन पूल उभारण्याचे आवाहन केले. मात्र पुरेसा प्रतिसाद न मिळाल्याने अखेर त्यांनी स्वतःच खर्च उचलण्याचा निर्णय घेतला. स्वतःच्या मेहनतीच्या पैशातून सुमारे ७० ते ८० हजार रुपये खर्च करून त्यांनी नाल्यावर मजबूत पूल उभारला. विशेष म्हणजे, केवळ आर्थिक मदतच नव्हे तर बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर स्वतः उपस्थित राहून त्यांनी कामाची देखरेख केली. या पुलामुळे आता शेतकरी, शेतमजूर तसेच नागरिकांना सुरक्षित आणि सुलभ मार्ग उपलब्ध झाला आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेली वाहतुकीची समस्या दूर झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# जिल्हा परिषदेच्या 'वॉल ऑफ फेम'साठी तीन अधिकाऱ्यांची निवड

### सीईओ सत्यम गांधी यांच्या हस्ते देशमुख, तेटू, नाडे यांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२ अमरावती -** अमरावती जिल्हा परिषदेच्या 'वॉल ऑफ फेम'साठी जून महिन्याकरिता तीन अधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहाय्यक आनंद तेटू आणि चिखलदऱ्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्र नाडे यांचा समावेश आहे.

या तिन्ही अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल त्यांची छायाचित्रे 'वॉल ऑफ फेम'वर झळकली आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) सत्यम गांधी यांच्या हस्ते त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कामाला प्रोत्साहन देण्यासाठी तत्कालीन सीईओ संजीता महापात्र यांनी हा उपक्रम सुरू केला होता. जिल्हा परिषदेच्या कामकाजाची गुणवत्ता वाढवण्यासाठी असे उपक्रम भविष्यातही सुरू ठेवले जातील, असे सीईओ सत्यम गांधी यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते.

जून महिन्याच्या पहिल्या दिवशी डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख, सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहाय्यक आनंद तेटू आणि चिखलदऱ्याचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्र नाडे यांना 'वॉल ऑफ फेम'जवळ निमंत्रित करून सीईओ गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) डॉ. श्रीराम कुळकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे, कार्यकारी अभियंता (सिंचन) सुनील जाधव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सतीश मुगल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या (डीआरडीए) प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांनी राज्य पुरस्कृत महा आवास योजनेत अमरावती जिल्ह्यास राज्यात द्वितीय क्रमांक मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

सामान्य प्रशासन विभागातील वरिष्ठ सहाय्यक आनंद तेटू यांनी आस्थापनाविषयक प्रकरणांमध्ये शून्य प्रलंबित्व साध्य करून कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण निर्माण केले आहे. तर, चिखलदऱ्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र नाडे यांनी सन २०२५-२६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सेमाडोह येथून कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया कार्यक्रमात जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. याच उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांची 'वॉल ऑफ फेम'साठी निवड करण्यात आली.

# यूरिया-डीएपी खताचा साठाच नाही, नेरपिंगळाई परिसरातील शेतकरी संकटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ नेरपिंगळाई-** खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना नेरपिंगळाई परिसरातील शेतकरी यूरिया व डीएपी खतांच्या तीव्र टंचाईचा सामना करीत आहेत. मॉन्सूनच्या आगमनाची चाहूल लागताच शेतकऱ्यांनी शेतमशागतीची कामे, बांधबंदिस्ती, नांगरणी, वखरणी तसेच बियाण्यांची खरेदी पूर्ण केली आहे. मात्र पिकांसाठी यूरिया आणि डीएपी खत उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

नेरपिंगळाई व परिसरातील कृषी सेवा केंद्रांवर गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांची मोठी गर्दी होत आहे. अनेक शेतकरी खतांच्या शोधात एका दुकानातून दुसऱ्या दुकानात फिरत आहेत. मात्र बहुतांश ठिकाणी यूरिया व डीएपीचा साठा संपल्याचे चित्र असून काही ठिकाणी खत उपलब्ध होण्याबाबत निश्चित माहितीही दिली जात नसल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद यांच्यासह इतर खरीप पिकांसाठी डीएपी व यूरिया खताचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. पेरणीपूर्वी आणि पिकांच्या प्रारंभिक वाढीच्या टप्प्यात या खतांची गरज भासत असल्याने शेतकरी आधीच साठा करून ठेवण्याचा प्रयत्न करतात. यावर्षी मात्र हंगामाच्या सुरवातीलाच खतांची कमतरता जाणवत असल्याने शेतकरी संभ्रमात आहेत. शेतकऱ्यांच्या मते, केंद्र आणि राज्य सरकारकडून दरवर्षी खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात खरीप हंगाम सुरू होताच खतांची टंचाई निर्माण होत असल्याने नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकऱ्यांना वेळेवर खते उपलब्ध झाली नाहीत तर पेरणी उशिरा होण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि आर्थिक उत्पन्नावर होऊ शकतो. सध्या शेतीसाठी लागणारे बियाणे, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

# अमरावती जिल्ह्यात वादळी पाऊस, काही भागात गार पडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

अमरावती शहर व जिल्ह्यातल्या काही तालुक्यांमध्ये सोमवारी जोरदार मान्सून पूर्व पाऊस झाला. काही ठिकाणी झाडे कोसळली, विजेचे खांब पडल्याने वीज पुरवठा खंडीत झाला. सखल भागात पाणी शिरले. काही भागांमध्ये तुरळक स्वरूपात गार देखील पडली.

अमरावती शहरात साडेतीन वाजताच्या दरम्यान पावसाला जोरात सुरूवात झाली. तब्बल सव्वातास पाऊस सुरू होता. अधूनमधून काही भागात तुरळक गार पडली. या मुसळधार पावसामुळे शहरातल्या अनेक सखल भागामध्ये पाणी शिरले. विशेष म्हणजे अमरावती महानगरपालिकेच्या आवारात तळे साचले होते. काही मुख्य रस्त्यांवरही पाणी तुंबले होते. नाल्यांमध्ये पाणी तुंबल्याने ते रस्त्यावर आले होते. मनपाच्या स्वच्छता विभागाची पोलखोल पावसाने केली. या पावसाने गरमीने हैराण झालेल्या अमरावतीकरांना गारव्याचा दिलासा दिला. पाऊस थांबल्यानंतरही ढगाळ वातावरण होते आणि थंड हवा सुरू होती. जिल्ह्याच्या अन्य तालुक्यातही पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी हलका तर काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस आला. काही ठिकाणी नुकसानीची नोंद झाली आहे.

### सखल भागात पाणी शिरले



### अचलपुरात मुसळधार पाऊस

गेल्या तीन महिन्यांपासून प्रचंड उष्णतेने होरपळणार्या अचलपूर-परतवाडा शहराला अखेर मान्सूनपूर्व पावसाने मोठा दिलासा दिला. रविवारी व सोमवारी शहरात थंड वार्यासह मुसळधार पावसाच्या सरी कोसळल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. उकाड्याने त्रस्त नागरिकांसह जनावरांनाही या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला. पावसासोबतच सोसाट्याचा वारा वाहिल्याने वातावरणातील उष्णता कमी झाली. अनेक भागांमध्ये रस्त्यांवर पाणी साचले असले तरी या पावसाने मान्सूनच्या आगमनाची चाहूल दिल्याचे चित्र दिसून आले. शेतकर्यांनी खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला असला तरी घाईघाईने पेरणी करू नये, असा सल्ला कृषी तज्ज्ञांकडून देण्यात येत आहे. महाराष्ट्रात साधारणपणे ७ जूननंतर मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे.

### वरूडात चक्रीवादळासह गारपीट

सोमवारी वरूड शहरात दुपारी दोन वाजताचे दरम्यान अचानक चक्रीवादळ आले. यामध्ये राष्ट्रीय महामार्गासह अनेक ठिकाणची झाडे उन्मळून पडली. तहसील कार्यालयासमोर चौकातील एक महाकाय झाड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र उर्फ बबलू पावडे यांच्या कारवर आदळले. मात्र, समयसूचकता पाळून सभापती पावडे, त्यांचा मुलगा आणि दोन मित्रांसह बाहेर पडल्याने थोडक्यात बचावले. या झाडामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक खोळंबली होती. वादळीवार्याने अनेकांच्या घरांवरील पत्रे उडाले, विद्युतवाहिन्या तुटून पडल्या, झाडाखाली असलेल्या दुचाकी सुद्धा क्षतीग्रस्त झाल्या. शहरातील विद्युत पुरवठा खंडित झाला तर वाहतूक ठप्प झाल्याने रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा लागल्या. यावेळी नगर परिषद अग्निशमन दल आणि वरूड पोलिसांनी रस्ता मोकळा करून वाहतूक सुरू केली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# राजूरा बेडे जंगलात युवतीचा जळालेला मृतदेह; सरिया खुपसून हत्या

## प्रेमसंबंधाचा तपास सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** जिल्ह्यातील चांदूर रेल्वे मार्गावरील राजूरा बेडे परिसरातील जंगलात एका अज्ञात युवतीचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. प्राथमिक तपासात युवतीच्या पोटात लोखंडी सरिया खुपसून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यानंतर ओळख पटू नये म्हणून मृतदेहावर पेट्रोल टाकून जाळण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.मंगळवारी दुपारी एका चरवाह्याला जंगलातून दुर्गंधी येत असल्याचे जाणवले. त्याने परिसरात शोध घेतला असता जळालेला मृतदेह आढळून आला. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. दरम्यान, सोशल मीडियावर ही बातमी पाहिल्यानंतर टॉवर लाईन परिसरातील एक महिला घटनास्थळी पोहोचली. मृतदेहाजवळील अर्धवट जळालेले कपडे आणि इतर बाबींवरून तिने मृत युवती आपल्या परिसरातील असल्याचा संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे पोलिसांनी तपासाची दिशा टॉवर लाईन भागाकडे वळविली आहे.घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त श्याम घुगे, गाडगेनगरचे ठाणेदार गोरखनाथ जाधव तसेच गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांनी फॉरेन्सिक तज्ज्ञ, डॉग स्कॉड आणि फिंगरप्रिंट पथकासह घटनास्थळाची पाहणी केली. हत्या अन्य ठिकाणी करून पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह जंगलात आणून जाळण्यात आल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.प्रेमसंबंध, कौटुंबिक वाद किंवा ऑनर किलिंगच्या दृष्टीनेही तपास सुरू असून, परिसरातील बेपत्ता महिलांच्या नोंदी तपासल्या जात आहेत. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

# विधान परीषद निवडणुकीत पंचरंगी लढत !

# ५ उमेदवारांचे नामांकन दाखल

### ४ जूनपर्यंत अर्ज परत घेण्याची मुदत

### सहा दिवसांत ७४ इच्छुकांनी नामांकनाची उचल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२ अमरावती :**
महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूकी–साठी नामनिर्देशन प्रक्रियेत सोमवारी शेवटच्या दिवशी महायुतीकडून भाजपाचे प्रवीण पोटे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीकडून निलेश विश्वकर्मा, अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया व प्रशांत महल्ले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे उमेदवारी अर्जाची संख्या पाचवर पोहोचली असून या अर्जाची मंगळवारी छाननी होणार आहे. या उमेदवारांना नामांकन अर्ज मागेघेण्याकरिता गुरुवारपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी कार्यालयात २५ मे ते १ जूनदरम्यान नामनिर्देशन प्रक्रिया पार पडली. या सहा दिवसांत इच्छुकांचे ७४ अर्ज प्राप्त झाले आहेत तर महाविकास आघाडी व महायुतीसह तीन अपक्षांनी नामांकन दाखल केले आहेत. सोमवारी शेवटच्या दिवशी सर्वाधिक चार उमेदवारी अर्ज दाखल झालेत. यामध्ये महायुतीकडून भाजपाचे प्रवीण पोटे, वंचित बहुजन आघाडीकडून नगरसेवक नीलेशविश्वकर्मा, अपक्ष म्हणून विप्लव बाजोरिया,




प्रशांत महल्लेया उमेदवारांचा समावेश आहे.

यापुर्वी महाविकास आघाडीकडून काँग्रसचे हर्षजित देशमुख यांनीशनिवारी नामांकन अर्ज दाखल केला आहे. या सहा – दिवसांत ७४ इच्छुकांनी नामांकनाची उचल केली – असली तरी प्रत्यक्षात पाचच अर्ज दाखल झाले आहेत. या प्राप्त अर्जाची मंगळवारी छाननी करून वैध अर्जाची प्रसिद्धी केली जाणार आहे. या उमेदवारांना नामांकन मागे घेण्याकरिता तीन दिवस म्हणजे ४ जूनपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणूक रिंगणातून कोण माघार घेतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गावठी पिस्तुल, जिवंत काडतूस, तलवारीसह तिघांना अटक

### अंजनगाव सुर्जी पोलिसांची दबंग कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती –** गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या तिन आरोपींना अंजनगावसुर्जी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करुन पकडले. आरोपींजवळून गावठी पिस्तूल, जिवंत काडतूस आणि दोन तलवारी जप्त करण्यात आल्या आहेत.

एका सुझुकी ॲक्सेस मोपेडवर तीन तरुण संशयीतपणे फिरत असल्याची माहिती पोलिसांना सोमवारी मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी परतवाडा रोडवरील हॉटेल पद्मश्री जवळ सापळा रचला. काळी वेळातच ती मोपेड जाताना दिसली. पोलिसांनी चहूबाजूने घेरुनत्यांना पकडले. त्यांची झडती घेतली असता, त्यांच्याजवळ पिस्तुल, जिवंत काडतूस आणि दोन तलवारी आढळून आल्या. आरोपी वंश दीपक साहू (वय २० रा अंजनगावसुर्जी) याच्याकडे देशी बनावटीचे एक पिस्तूल, तर पॅटच्या खिशात दोन जिवंत काडतुसे (किं २० हजार ६००) सापडली. दुसरा आरोपी अनिल मदन सोळंके (वय २३रा विलासनगर, अमरावती) याचेकडून एक लोखंडी तलवार सापडली. तिसरा आरोपी अल्केश दिपक पवार (वय २१ राआठवडीबाजार परतवाडा) याच्याजवळून लोखंडी तलवार आढळली. गुन्हयात वापरलेल्या मोपेड सुझुकीसह (एमएच २७ इए ८०७७) अन्यशस्त्र असाएकूण १ लाख ५६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गमीण पोलिस अधिक्षक निकेतन कदम, अप्पर पोलिस अधिक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक सुरज बोंडे, अनिल चांदोरे, विशाल पोळ, जयसिंग चव्हाण, रवि राठोड, अमित घाटे, मोहसिन पठाण, शुभम मारकंड, अक्षय शेळके या पथकाने पार पाडली.

# जिल्ह्यातील चार बसस्थानक ठरले स्वच्छ व सुंदर

### परतवाडा, मोर्शी, चांदूर बाजार, अंजनगाव सुर्जी आगाराचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** शासनाच्या 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक' अभियानांतर्गत राज्यातील बसस्थानकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये अमरावती मधील चार बसस्थानकांचा समावेश आहे. ब गटातून जिल्ह्यातील परतवाडा बसस्थानक प्रथम, मोर्शी द्वितीय व चांदूर बाजार बसस्थानकाने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच क गटातून अंजनगाव सुर्जी बसस्थानक द्वितीय क्रमाकावर आहे.राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बसस्थानक' अभियानांतर्गत राज्यातील बसस्थानकांची तपासणी करण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातील आठही बसस्थानकाची जिल्ह्याबाहेरील पथकाकडून तपासणी करण्यात आली.याचा निकाल घोषित करण्यात आला असून यामध्ये जिल्ह्यातील चार बसस्थानकांनी स्थान पटकाविले आहे. तीन गटामध्ये ही स्पर्धा पार पडली. यामध्ये ब गटातून




परतवाडा, मोर्शी आणि चांदूर बाजार बसस्थानकाने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला आहे. तर सी गटातून अंजनगाव सुर्जी बसस्थानकाने द्वितीय क्रमांक पटकाविला आहे. सोमवारी एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त अमरावती प्रादेशिक कार्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले होते. यामध्ये या चार बसस्थानकाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह उत्कृष्ट कामगिरी बजाविणाऱ्या चालक, वाहक व अन्य कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रादेशिक व्यवस्थापक रोहन पलांगे तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी अभियंता राहुल मोडक, सांख्यिकी अधिकारी नितीन देशमुख,विभागीय वाहतूक अधिकारी संदीप रायलवार, उप यंत्र अभियंता विजय वाकोडे, विभागीय अभियंता (विद्युत) वर्षा गायकवाड यांची उपस्थिती होती.

### 'लालपरी गौरवरत्न पुरस्कार' प्रदान

प्रवासी सेवेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विभागातील १२ कर्मचाऱ्यांना 'लालपरी गौरवरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यामध्ये वाहक अनिल गणोरकर, वाहक शब्बीर हुसेन सफदर हुसेन, व्हि.पी. क्षीरसागर, राजु चव्हाण, गणेश दवेरे, ए.एम. अहमद, आय.यू. खान, सुधिर शिगोटे, गणेश बझर, सुनील बोरडे, संजय लांडे, सचिन पिगळे यांचा समावेश आहे. तसेच २५ वर्षांहून अधिक काळ विनाअपघात सेवा करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये बडनेरा आगाराचे सय्यद मकसूद सय्यद मकतुम, परतवाडा आगाराचे मसूद खान हसन खान, चांदूर रेल्वे आगाराचे गजेंद्र देशमुख,दर्यापूर आगाराचे रविद्र नवघरे, चांदूर बाजार आगाराचे प्रकाश डहाके आणि विभागीय कार्यालयाचे दिवाकर गौरकर यांचा समावेश आहे. याशिवाय एप्रिल २०२५ ते मार्च २०.२६ या कालावधीत २६० दिवस अपघातविरहित सेवा देणारया सात चालकांमध्ये उमेश रामदे, कपिल अमृतकर, प्रविण मानकर, अविनाश ढवळे, देवेंद्र देवळेकर, निसार अहमद मजहर मिया आणि सचिन चौधरी यांचा समावेश आहे.

# धारणी तालुक्यात जोरदार वादळी तांडव १५० पेक्षा अधिक गावात अंधारी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२धारणी**
धारणी शहरासह जवळच्या अनेक गाव शिवारात सोमवारच्या रात्री जोरदार वादळासह तुफानी पाऊस कोसळल्याने सर्वत्र दाणादाण उडाली. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेचे तार तुटले तर पोल वाकले. त्यामुळे तालुक्यातील १५० पेक्षा अधिक गावे विज पुरवठा खंडित झाल्याने अंधारात बुडाली आहे. कुसुमकोट ते भोकरबर्डी हाय वे वर १५ ते २० झाडे पडलेली होती. अर्धा तास बऱ्हाणपूर आणि खंडवा वाहतूक बंद होती.गंभीरता लक्षात घेता माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीपाल पाल यांनी आपल्या जे सीबीने रोडवरील झाडे हटवून रस्ता मोकळा केला. रविवारी पहाटे सुद्धा वादळाने अनेक झाडांची पडखड झालेली होती.विशेष असे की, सार्वजनिक बांधकाम विभाग



आपल्या रोडवरील जाम मोकळा करत नाही, विजेचे तार अनेक ठिकाणी तुटलेले असल्याने धारणी उप केंद्रातील १५० गावे अंधारात बुडालेली आहेत, विशेष म्हणजेमेळघाट परिसरात गेल्या दोन दिवसांपासून प्री–मान्सून पावसाने जोरदार हजेरी लावत संपूर्ण परिसर अक्षरशः झोडपून काढला.

# विषारी दारु पिल्याने तिघांची प्रकृती बिघडली जिल्हा रुग्णालयात दाखल, मुख्य आरोपी फरार

### घटनेनंतर पोलिसांनी परिसरात छापा टाकला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चांदूर रेल्वे**
चांदूर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरखेडा येथे एक खळबळजनक प्रकरण उघडकीस आले आहे, जिथे विषारी दारू प्यायल्याने तिघेजण गंभीर आजारी पडले.

प्राथमिक उपचार मिळाल्यानंतर त्यांना अमरावती जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर ग्रामीण पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली. त्यानंतर घटनास्थळी छापे टाकून लाखो रुपयांचा माल जप्त करण्यात आला. मुख्य आरोपी गिरीश सुभाष पवार (४२, गौरखेडा, चांदूर रेल्वे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आला आहे. करण्यात मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी केलेल्या

### आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपी गिरीश सुभाष पवार याच्याविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सध्या फरार असून, त्याला अटक करण्यासाठी पोलीस विविध ठिकाणी छापे टाकत आहेत. तपास सुरू आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांना तीन व्यक्ती संशयास्पद अवस्थेत आढळल्या. यामध्ये दिनेश गुणवंत लाड (४६), सागर ज्ञानेश्वर टेंभे (३८) आणि मनीष देवराव शेंडे (४४) यांचा समावेश आहे. तिघांचीही प्रकृती खूपच खालावली होती आणि त्यांना सतत उलट्या होत होत्या. पोलिस–ांनी त्यांना तात्काळ चांदूर रेल्वे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीनंतर, डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे जाहीर केले आणि पुढील उपचारांसाठी त्यांना अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. मात्र, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा न झाल्याने त्यांना दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार, रुग्णालयात उपचार घेत असलेल्या तिन्ही व्यक्तींनी त्यांच्या जबाबात सांगितले की, त्यांनी गिरीश पवारने तयार केलेली दारू प्यायली होती. दारू प्यायल्यानंतर काही वेळातच त्यांची प्रकृती अचानक खालावली आणि त्यांना उलट्या व इतर आरोग्य समस्या लागल्या. या जाणवू खुलास्यानंतर, पोलिसांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून तपासाची व्याप्ती वाढवली आहे.

### सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका

पोलिसांनी आरोप केला आहे की, आरोपी गिरीश पवार हा वैध परवाना किवा सरकारी परवानगीशिवाय बेकायदेशीरपणे गावठी दारू तयार करून विक्रीसाठी साठवत होता.

आरोपीच्या कृत्यांमुळे केवळ कायद्याचे उल्लंघनच झाले नाही, तर सामान्य नागरिकांच्या आरोग्याला आणि जीवालाही गंभीर धोका निर्माण झाला होता. तज्ज्ञांच्या मते, बेकायदेशीरपणे तयार केलेल्या दारूमध्येविषारी पदार्थांची भेसळहोण्याची शक्यता असते, ज्यामुळे मृत्यूही ओढवू शकतो.अशा प्रकरणांमध्ये वेळेवर कारवाई करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# आरोग्य व शिक्षण सुविधांच्या बळकटीकरणासाठी आयुक्त वर्षा लड्डा यांची विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती –**अमरावती महानगरपालिकेतर्फे शहरातील आरोग्य व शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी शहरातील विविध दवाखाने व शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामकाज, सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात आयसोलेशन दवाखाना, महानगरपालिका शाळा जेवड, महानगरपालिका शाळा बडनेरा तसेच मोदी हॉस्पिटलचा समावेश होता.पाहणी दौऱ्याची सुरुवात आयसोलेशन दवाखान्या पासून करण्यात आली. यावेळी आयुक्त वर्षा लड्डा यांनी रुग्णांसाठी उपलब्ध वैद्यकीय सुविधा, उपचार व्यवस्था, औषधसाठा, मनुष्यबळाची उपलब्धता, स्वच्छता व्यवस्था तसेच रुग्णसेवेची गुणवत्ता यांची सखोल तपासणी केली. दवाखान्यातील विविध विभागांना भेट देऊन त्यांनी डॉक्टर, परिचारिका व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत आवश्यक सूचना दिल्या. रुग्णांना वेळेत, दर्जेदार व परिणामकारक आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक जबाबदारीने कार्य करण्याचे निर्देश त्यांनी दिले. दवाखाना परिसरात स्वच्छता राखण्यासोबतच रुग्णांसाठी आवश्यक सुविधा अधिक सक्षम करण्यावर भर देण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.याच परिसरातील महानगरपालिका शाळेचीही त्यांनी पाहणी केली. शाळेच्या इमारतीची दुरुस्ती आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्याने बांधकाम विभागाने तातडीने नियोजन करून आवश्यक दुरुस्तीची कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश आयुक्तांनी दिले.त्यानंतर आयुक्त वर्षा लड्डा यांनी महानगरपालिका शाळा जेवड येथे भेट देऊन शैक्षणिक वातावरण, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, स्वच्छता व्यवस्था तसेच सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सुरू असलेल्या शाळेच्या बांधकामाची तपासणी करताना कामाची



गुणवत्ता, दर्जा व वेळेत पूर्णत्व यावर विशेष भर देण्यात आला. सदर शाळा भविष्यात अमरावती जिल्ह्यातील आदर्श व उत्कृष्ट शाळा म्हणून विकसित व्हावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.यानंतर महानगरपालिका शाळा बडनेरा येथे विद्यार्थ्यांची उपस्थिती, अध्यापन पद्धती, मूलभूत सुविधा, शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच शैक्षणिक गुणवत्ता यांचा आढावा घेण्यात आला. शाळेतील वाढती पटसंख्या लक्षात घेता विद्यार्थ्यांना पुरेशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी बांधकाम विभागाने अतिरिक्त वर्गखोल्यांच्या निर्मितीबाबत नियोजन करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.पाहणी दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात आयुक्त वर्षा लड्डा यांनी मोदी हॉस्पिटलला भेट देऊन तेथील विविध विभागांची पाहणी केली. रुग्णसेवा, वैद्यकीय उपकरणे, आपत्कालीन सेवा, स्वच्छता व्यवस्था तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिकेच्या महत्त्वपूर्ण आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या मोदी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी व्यवस्थापन अधिक सक्षम व परिणामकारक करण्यावर भर देण्यात आला.आरोग्य व शिक्षण या मूलभूत सेवांच्या गुणवत्तेमध्ये सातत्याने सुधारणा करणे ही महानगरपालिकेची प्राथमिकता असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रत्यक्ष पाहणी, नियमित आढावा आणि आवश्यक त्या सुधारणा यांच्या माध्यमातून नागरिकांना अधिक सक्षम, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिका प्रशासनाचा प्रयत्न राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, उद्यान अधीक्षक अजय विंचुरकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती कोवे, डॉ.देवेंद्र गुल्हाणे, डॉ.अश्विनी खडसे, मालमत्ता अधिकारी सचिन मांडवे, उपअभियंता शरद तिनखेडे, लक्ष्मण पावडे, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# पोटे पाटील, देशमुख यांच्या शपथपत्रात कोटींची उड्डाणे

## स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक, अपक्ष बाजोरियाही चर्चेत




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ अमरावती**

विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीत पाच उमेदवार रिंगणात असले तरी हेविवेट उमेदवार तीनच ठरले आहेत. यामध्ये महायुतीमध्ये भाजपचे उमेदवार प्रवीण मोतीरामजी पोटे, तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचे उमेदवार हर्षजित अनंतराव देशमुख यांनी उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या शपथपत्राची चर्चा होत आहे. यामध्ये दोन्ही उमेदवारांची स्थावर व जंगम मालमत्तेमध्ये कोटींची उड्डाणे आहेत.

### विप्लव बाजोरिया



अपक्ष उमेदवार विप्लव बाजोरिया अकोलाचे रहिवासी आहेत. शिक्षण एलएलबी असून यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही. त्यांच्याकडे २४.३४ लाख रोख आहे तर मुव्हेबल असेट्स १५,१६,३५,५७० रुपये व पत्नी राशी यांच्याकडे १,१४,७२,२७४ रुपये तसेच स्वसंपादित मालमत्ता ७कोटी आहे. याचे आताचे बाजारमुल्य २४ कोटी आहे. त्यांच्याकडे २३.८१ लाखांचे दायित्व आहे.

### प्रवीण पोटे पाटील



येथील राठीनगरातील रहिवासी प्रवीण पोटे यांचे शिक्षण बी. कॉम. पर्यंत झाले आहे. आयकर विवरणात २०२५-२६ मध्ये त्यांचे ८५,२५,९९० रुपयांचे उत्पन्न दर्शविण्यात आले आहे. त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही. त्यांच्याजवळ ४,२०,७९४ रुपयांची रोख आहे. त्यांची बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये १७,२९,३२२ रुपये, एसबीआय ३४,६८,६३३ रुपयांसह अन्य तीन बँकांमध्ये गुंतवणूक आहे. प्रवीण बिल्डर्समध्ये १५.५० लाख व पत्नी अनुराधा यांची १२ लाखांची गुंतवणूक आहे. त्यांच्या नावे वाहन नाही, त्यांनी २,८६,७३,५४६ व २१,२५,५०० रुपयांचे वैयक्तिक कर्ज दिले आहे. त्यांच्याकडे २५० ग्रॅम व पत्नीकडे ७५५ ग्रॅम सोने आहे. याशिवाय त्यांच्याकडे ५ किलो, तर पत्नीकडे ४० किलो चांदीच्या वस्तू आहेत. विविध ठिकाणी स्वसंपादित मालमत्तांचे बाजारमूल्य १३७,९६,११,९६० रुपये तर पत्नीच्या नावे असलेल्या मालमत्तेचे सध्याचे बाजारमुल्य १३२,९१,३७,५०० रुपये आहे. पोटे यांच्याकडे २,७२,३५,२७५ रुपये, तर पत्नीकडे २,०८,४९,४२३ रुपयांचे दायित्व (कर्ज) आहे.

### हर्षजित देशमुख



त्रिमूर्तीनगर नागपूर येथील रहिवासी आहेत व त्यांचे शिक्षण एमबीएपर्यंत झाले आहे. ते व्हर्चुअल गॅलक्शी इंफोटेक या कंपनीचे संचालक आहेत. तर पत्नी एकता यांचा खासगी व्यवसाय आहे. हर्षजित यांचे आयकर विवरणात २०२५-२६ मध्ये २५,३९,७३१ रुपयांचे उत्पन्न दर्शविण्यात आले आहे. त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही. त्यांच्याकडे तीन लाख रुपये रोख व एचडीएफसी बँकेत ११,८६,८४८ रुपये, बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये ६३,७३,०६२ रुपये व युनियन बँकेत २,७६,१२७ रुपयांच्या ठेवी आहेत. याशिवाय त्यांनी विमा, फंड आदींमध्ये १.१८ कोटींची गुंतवणूक केली आहे. त्यांच्याकडे ४२.४५ लाख रुपये किमतीचे वाहन आहे. शिवाय त्यांच्याजवळ ३०० ग्रॅम व पत्नीकडे ६०० ग्रॅम सोने आहे. त्यांच्या पत्नीच्या नावे तिवसा तालुक्यातील माळेगाव येथे १.६२ हेक्टर आर शेती आहे. हर्षजितचे नावे नागपूर तेथे तीन फ्लॅट, तर पत्नीच्या नावे दोन फ्लॅट आहेत. हर्षजित यांच्याकडे ८४,९७,००० रुपयांचे दायित्व (कर्ज) आहे. त्यांची जंगम मत्ता २,८३,९३,७७० व स्वसंपादित २.२५ कोटींवर आहे.

# विदर्भातून २४ उमेदवार रिंगणात

## माजी मंत्री, आमदार आजमावणार नशीब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी सोमवारी (ता. १) उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी विदर्भातील चंद्रपूर वर्धा-गडचिरोली, अमरावती, नागपूर, यवतमाळ आणि भंडारा येथून एकूण २४ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. या निवडणुकीत माजी मंत्री, माजी आमदार आपले नशीब आजमावणार आहेत. चंद्रपूर-वर्धा-गडचिरोलीत महायुतीकडून भाजपचे अरुण लखानी यांनी तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे शैलेश अग्रवाल यांनी अर्थ दाखल केले, तसेच हिंगणघाट येथील सहकार नेते व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ॲड. सुधीर कोठारी यांनीही अर्ज दाखल केला आहे.महाविकास आर्यों येथील शैलेश अग्रवाल यांना संधी देत महायुतीच्या आधी उमेदवार निश्चित केला. तर दुसऱ्या दिवशी महायुतीने अरुण लखानी यांची उमेदवारी घोषित केली.अमरावतीत अखेरच्या दिवशी चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले. त्यामुळे या रिंगणारा आता पाच उमेदवार आले आहेत. यामध्ये माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, डॉ. नीलेश विश्वकर्मा, माजी आमदार विप्लव बाजोरिया, प्रशांत महल्ले व काँग्रेसकडून हर्षजित देशमुख यांचा समावेश आहे.

**नागपुरात लोंढे यांना संधी**

नागपुरात अखेरच्या दिवशी



पाच उमेदवारांकडून सहा अर्ज सादर झाले आहेत. यात भाजपचे डॉ. राजीव पोतदार यांच्यासह काँग्रेसचे अतुल लोंढे आणि दिनेश ढोले यांच्यासह अपक्ष राजेश जंगले आणि सुरेंद्र लोही यांनीही निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे अर्ज दाखल केला आहे.

**भंडाऱ्यात माविआचे ठरेना**

भंडारा येथे महायुतीचे उमेदवार म्हणून भाजपचे अविनाश ब्राह्मणकर यांनी अर्ज सादर केला, यावेळी खासदार प्रफुल पटेल, आमदार राजू कारेमोरे, परिणय फुके यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. तसेच अपक्ष म्हणून अभिषेक फारेगोरे, सचिन कुंभलकर यांनीही अर्ज दाखल केले आहेत. महाविकास आघाडीचा उमेदवार शेवटपर्यंत निश्चित झाला नसल्याने काँग्रेसकडून प्रफुल अग्रवाल, माजी आमदार दिलीप बनसोड व जिल्हा परिषदेचे सभापती नरेश ईश्वरकर यांनी अर्ज दाखल केले आहेत, यावेळी आमदार नाना पटोले व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**यवतमाळात पाच उमेदवार**

यवतमाळतून अखेरच्या दिवशी पाच उमेदवारांनी १० अर्ज दाखल केले. महायुतीत जागा शिदिसेनेला सुटली आहे. शिदिसेनेकडून दृष्यंत चतुर्वेदी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे साहेबराव कांबळे यांनी अर्जी दाखल केला असून, भाजपतर्फे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी अर्ज दाखल केला आहे. सय्यद फारूक तसेच साजिद बेग या दोन अपक्षांनीही उमेदवारी दाखल केली आहे.

# कर्जमाफीचा निर्णय स्वागतार्ह; शेतकऱ्यांची लढाई जिंकली

## -आमदार बच्चू कडू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती-** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी कर्जमाफीचा निर्णय झाल्यानंतर प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मनापासून आभार व्यक्त करताना त्यांनी नागपूर येथे झालेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व शेतकरी नेत्यांचेही विशेष आभार मानले.यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी दीर्घकाळ सुरू असलेली लढाई अखेर यशस्वी झाली असून हा निर्णय राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. ही कर्जमाफी शेतकऱ्यांचे आयुष्य बदलणारी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.कडू यांनी पुढे सांगितले की, सरकारने जाहीर केलेला प्रोत्साहन भत्ता वाढविण्याची गरज असून सध्या असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा वाढवून ती १ लाख रुपये करण्यात यावी. या मागणीसाठी आपला संघर्ष पुढेही सुरू राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच शेतकऱ्यांच्या मालाला योग्य हमीभाव मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत, हमीभावाच्या प्रश्नावरही आपण शेतकऱ्यांसोबत रस्त्यावर उतरून लढा देणार असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारने शेतमालाला न्याय्य दर देण्यासाठी ठोस धोरण आखावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# मेळघाट मधील गडगा नदीवरील पूल धोकादायक

## कठडे बसवून नवीन पूल उभारण्याची नागरिकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ धारणी**

तालुक्यातील धारणी ते साद्राबाडी मार्गावरील गडगा नदीवरील पूल नागरिकांसाठी जीवघेणा ठरत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. या पुलावर तत्काळ मजबूत कठडे बसवावेत तसेच पुलाची रुंदी वाढवून नवीन पूल उभारण्यात यावा, अशी मागणी नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. धारणी ते साद्राबाडी हा परिसरातील अनेक गावांना जोडणारा मुख्य मार्ग मानला जातो. साद्राबाडी, सुसदा आणि परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी तसेच व्यापारी मोठ्या प्रमाणात या रस्त्याचा वापर करतात. मात्र गडगा नदीवरील पूल अत्यंत अरुंद असल्याने दोन चारचाकी वाहनांना एकाच वेळी ये-जा करणे कठीण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. विशेषतः पावसाळ्यात नदीला पूर आल्यावर आणि रात्रीच्या वेळी पुलावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पुलावर सुरक्षेसाठी कोणतेही मजबूत कठडे नसल्यामुळे वाहन थेट नदीत कोसळण्याची भीती कायम असते. यापूर्वीही दोन युवक पुलावरून पडून मृत्युमुखी पडल्याची घटना घडल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मा वानखडे यांनी प्रशासनाकडे तातडीने पुलाची पाहणी करण्याची मागणी केली आहे. पुलाच्या दोन्ही बाजूंना मजबूत सिमेंट किंवा लोखंडी कठडे उभारावेत, धोकादायक



ठिकाणी गतिरोधक लावावेत तसेच इशारा फलक बसवावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी पुलाची रुंदी वाढवून नवीन पूल उभारण्याचीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, या निवेदनाच्या प्रती मेळघाटचे आमदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तसेच धारणी तहसीलदार यांनाही देण्यात आल्या आहेत. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

# पांदण रस्त्यांची कामे तातडीने सुरू करा

## प्रहार चा तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२धा.रेल्वे** धामणगाव रेल्वे तहसील कार्यालयावर प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आज२ जून मंगळवार रोजी दुपारी १ वाजता ठिय्या आंदोलन करण्यात आले. तालुका अध्यक्ष सुरज गंथडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात अमरावती जिल्हाध्यक्ष प्रवीण हेडवे यांची प्रमुख उपस्थिती होती. मातोश्री ग्राम समृद्ध शेत पांदण रस्ता योजनेअंतर्गत २०२३-२४ मध्ये उद्घाटन झाल्यानंतरही तालुक्यातील बहुतांश पांदण रस्त्यांची कामे अद्याप सुरू करण्यात आलेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. याबाबत तहसीलदारांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. शेत पांदण रस्त्यांची रखडलेली कामे तातडीने सुरू करावीत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने देण्यात आला

# अमरावती पोलीस दलात मोठी प्रशासकीय सर्जरी

## १६४ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदलीचा मार्ग मोकळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अमरावती शहर पोलीस दलात मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय फेरबदलाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, विविध पोलीस ठाणे व शाखांमध्ये पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण केलेल्या १६४ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सामान्य बदल्या करण्यात येणार आहेत. या प्रक्रियेला पूर्ण पारदर्शकता देण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी मंगळवारी सर्व बदलीपात्र कर्मचाऱ्यांचा विशेष दरबार घेत त्यांच्या अडचणी व मागण्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या.पोलीस मुख्यालयाच्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) ते पोलीस शिपाई दर्जापर्यंतच्या कर्मचाऱ्यांचा या पहिल्या टप्प्यात समावेश आहे. नियमानुसार पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण झालेल्या



कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत असून, या संदर्भात कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या विनंती अर्जांवरही सहानुभूतिपूर्वक विचार करण्यात आला. दरबारानंतर अंतिम बदली यादी लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.या प्रशासकीय फेरबदलाचा दुसरा टप्पा अधिक महत्त्वाचा मानला जात आहे. या टप्प्यात पोलीस निरीक्षक (पीआय) दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार असून, शहरातील तीन प्रमुख पोलीस ठाण्यांच्या ठाणेदारांनाही बदलीचा फटका बसणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. निर्धारित कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे या ठिकाणी नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे.पोलीस विभागाकडून ही नियमित प्रशासकीय प्रक्रिया असल्याचे सांगितले जात असले, तरी या माध्यमातून शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागी नव्या चेहऱ्यांना संधी मिळाल्यास पोलीस यंत्रणेची कार्यक्षमता, पारदर्शकता आणि प्रतिसाद क्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या व्यापक फेरबदला मुळे अमरावती पोलीस दलात उत्सुकता वाढली असून, आगामी काही दिवसांत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे आणखी मोठ्या हालचाली होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. शहराच्या सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

# कर्ज प्रकरणात शेतकऱ्यांना बँकांनी सिबिल सक्ती करू नये

## तिवसा तालुक्यात शेतकरी आक्रमक विविध १५ मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ तिवसा-** आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तिवसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित व न्याय हक्कांच्या मागण्यांकडे प्रशासनाचे काटेकोरपणे लक्ष वेधण्यासाठी तिवसा तालुक्यातील समस्त शेतकरी बांधव आणि शेतकरी पुत्रांच्या वतीने आज, २ जून रोजी तहसीलदार यांना निवेदन सादर केले. आगामी हंगामात शेतकऱ्यांची होणारी अडवणूक थांबवून त्यांना त्यांचे हक्क तातडीने मिळवून द्यावेत, शिवाय, शेतकऱ्यांना कर्ज प्रकरणात सिबिल सक्ती करू नये अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तिवसा नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेते अनिल थुल आणि सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांसह हे निवेदन प्रशासनाला सोपवण्यात आले. यामध्ये गेल्या वर्षीच्या खरीप हंगामातील सोयाबीन व कपाशीचा थकीत पीक विमा शेतकऱ्यांना तातडीने वाटप करण्यात यावा. तसेच खरीप हंगामातील 'खरडपट्टी' नुकसानीचे प्रलंबित अनुदान अद्याप मिळालेले नाही, त्यातही सामाईक शेती असलेले शेतकरी सर्वाधिक वंचित आहेत, त्यांना हे अनुदान त्वरित मिळावे, बिआणे अनुदान योजनेतील बिआणे शेतकऱ्यांना पेरणीपूर्वीच उपलब्ध करून द्यावे आणि बाजारात बिआण्यांचे भाव स्थिर ठेवावेत. तसेच बाजारात युरियासह इतर खतांचा मुबलक साठा विक्रीसाठी खुला करावा. महत्त्वाचे म्हणजे, खत आणि बिआणे खरेदी करताना शेतकऱ्यांना सामोरे जाव्या लागणाऱ्या 'लिंकिंग'च्या प्रकारावर तातडीने गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी. तालुक्यात खत आणि



बिआण्यांचा काळाबाजार रोखण्यासाठी चोख व्यवस्था करावी, कृषी विभागाकडून मिळणाऱ्या साहित्याचे अनुदान गेल्या दोन वर्षांपासून मिळालेले नाही, ते प्रलंबित अनुदान तात्काळ देण्यात यावे, बँकेंमार्फत शेतकऱ्यांना होणारा पीक कर्ज पुरवठा हा पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर विदर्भातील शेतकऱ्यांनाही पुरेशा प्रमाणात व सुलभरित्या देण्यात यावा. यासोबतच नियमित कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी प्रामाणिकपणे व नियमित कर्ज भरणाऱ्यांना ५० टक्के प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, कपाशी, सोयाबीन, तूर, हरभरा यांसह सर्वच शेतमालाला योग्य हमीभाव (चड्झ) मिळावा आणि शासकीय हमीभाव खरेदी केंद्र वेळेवर सुरू करून खरेदीची हमी द्यावी. वन्यप्राणी व भटक्या जनावरांच्या बंदोबस्तासाठी वनविभागाने तात्काळ पंचनामे करून योग्य भरपाई द्यावी, महसूल विभागातील कामांचा प्रलंबित असलेला विलंब टाळून जमिनीच्या नोंदी, फेरफार आणि ७/१२ उतारे मिळण्यासाठी शेतकऱ्यांना होणारा नाहक त्रास त्वरित कमी करावा. तसेच तालुक्यात कृषी उत्पादन साठवणुकीसाठी शासकीय गोदामे आणि कोल्ड स्टोरेज (शितगृह) सुविधा वाढवण्यात याव्यात यासह एकूण १५ मागण्या करण्यात आल्या.खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. जर प्रशासनाने या सर्व मागण्यांवर सकारात्मक व तातडीने निर्णय घेतला नाही, तर येत्याकाळात शेतकऱ्यांचे जनआंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. यावेळी अमोल वाडीभसमे, योगेश गोरे, अजय आमले, अनिल मकेश्वर, प्रकाश मेश्राम, प्रफुल फटिंग, रणजित कावरे, किशोर सातपुते, प्रशांत वानखडे, प्रफुल मकेश्वर, स्वप्नील उमप, रोशन इंगोले, मनोज खाकसे, प्रकाश चिचखेडे, अमोल बेलसरे, निलेश देवळे, अनिल मेश्राम , स्वप्नील तूरकाने, विनोद मेश्राम, हरिदास खडसे, पंकज देवळे, रमेश हिवराळे, चंद्रशेखर बनसोड, मुकुंद चिंचे, मनीष माहोरे यांची उपस्थिती होती.